# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ५ वा ❑ शुक्रवार दि.३१ जानेवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न टांगणीवर?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



भंडाऱ्यात ऑर्डनन्स फॅक्टरीमध्ये पुन्हा एकदा अतिसंवेदनशील ठिकाणी काम करणाऱ्या कर्मच्याऱ्यांच्या सुरक्षेच्या मुद्दा उपस्थित झाला आहे. भंडारा शहराच्या दक्षिणेला जवळपास १६ किलोमीटर दूर अंतरावर जवाहरनगरजवळ भंडारा आयुध निर्माणी आहे. येथे अतिउच्च दर्जाच्या बारूद आणि स्फोटकांची निर्मिती, साठवणूक केली जाते. त्यासाठी वेगवेगळे सेक्शन आणि वेगवेगळ्या इमारती आहेत. यातीलच लो टेंपरेचर प्लास्टिक एक्सप्लोसिव्ह (एलटीपीई) च्या इमारतीत बारूदचे गोळे बनविण्याचे काम सुरू असताना सकाळी साडेदहा ते पावणेअकराच्या सुमारास अचानक भीषण स्फोट झाला. हा स्फोट एवढा शक्तिशाली होता की, एलटीपीईची भली मोठी इमारत जमीनदोस्त झाली आणि त्यामध्ये काम करणाऱ्या अनेक कामगारांच्या अक्षरशः चिंधड्या उडाल्या.

वर्षभरात या ऑर्डनन्स फॅक्टरीतील हा दुसरा मोठा स्फोट असल्याने संरक्षण मंत्रालयाने या स्फोटाची गंभीर दखल घेत तीन सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे. या स्फोटाचे कारण त्या चौकशीतून समोर येणे अपेक्षित आहे. मात्र ऑर्डनन्स फॅक्टरीत कामगारांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांचे नियमित ऑडिट होत होते का हा सवाल उपस्थित होत आहे. या आधी देखील २००५ मध्ये एनआर विभागातील स्फोटात पाच जणांचा मृत्यू झाला.तसेच २००९ मध्ये जानेवारीत झालेल्या स्फोटात अविनाश मेश्राम याचा मृत्यू झाला होता.१९९७ मध्ये देखील असाच स्पोट झाला होता..

ऑर्डनन्स फॅक्टरीच्या एकूण ऑडिट प्रणालीवरच 'एमआयएल'ने (म्युनिशन्स इंडिया लिमिटेड) दोन वर्षांअगोदर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यातील त्रुटींची पूर्तता झाली की केवळ त्या पूर्ण करण्याचा फार्स करण्यात आला, असा सवाल समोर येत आहे.

एक्स्पोसिव्ह फॅक्टरीत मानवी चुकांमुळे किंवा सुरक्षा उपाययोजनांत लहानशी त्रुटी राहिल्याने भीषण स्फोट होऊ शकतो. भंडारा ऑर्डनन्समध्ये झालेल्या स्फोटाचे नेमके कारण शोधण्याचे मोठे आव्हान आता तेथील प्रशासनासमोर आहे.कारख्यात होणाऱ्या स्फोटामुळे कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न समोर येतो.

कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न हा उद्योग आणि औद्योगिक क्षेत्रातील एक महत्त्वाचा विषय आहे.कामगारांना होणारे अपघात, त्यामुळे होणारे मृत्यू आणि त्यांच्या सुरक्षेबाबत होणारे अमानवीय प्रकार यामुळे हा प्रश्न ऐरणीवर येतो.भंडाऱ्यातील स्पोटा आधी २०२३ मध्ये तळवडे येथील कंपनीला लागलेल्या आगीने नऊ महिलांचा बळी घेतला. या घटनेमुळे स्फोटके किंवा फटाक्यांच्या कंपनीत काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न एकदा ऐरणीवर आला होता. या कंपनीमध्ये कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही काळजी घेतली न गेल्याने अनेक महिलांचा बळी गेला. मात्र, कायद्यानुसार फटाके अथवा तत्सम ज्वलनशील पदार्थ बनविण्याच्या कंपनीत कर्मचाऱ्यांचे आरोग्य व सुरक्षा यांच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करणे गरजेचे आहे.अशा उद्योगांमधील उत्पादनांमध्ये कोणते घटक व रसायने वापरली जातात, याची माहिती कर्मचाऱ्यांना देणे कायद्याने बंधनकारक आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांना योग्य प्रशिक्षण, घालण्यासाठी फायर सूट, ॲप्रन, हँडग्लोव्हज व मास्क देण्यात यावीत. काम करताना घ्यावयाची काळजी, काम झाल्यावर आरोग्याच्या दृष्टीने घेण्याची काळजी याच्या सूचना मराठीमध्ये दर्शनी भागात लावणे गरजेचे आहे. तसेच कायद्यानुसार या कर्मचाऱ्यांची दर सहा महिन्यांनी आरोग्याची चाचणी होणे आवश्यक आहे. यामध्ये लंग फंक्शन टेस्ट महत्त्वाची आहे. फायर कॅबिनेट स्टोरेजची आवश्यकता फटाके बनविण्यासाठी संबंधित कंपनीमध्ये आवश्यक कच्चा मालाचा किती साठा असावा? त्यातील रसायनांनुसार त्याची विभागवारी करून साठवणूक कशी असावी? कोणती रसायने कुठे ठेवावीत ? तयार उत्पादने कशी ठेवावीत ? यासाठी देखील कायद्यानुसार नियमावली बनविण्यात आलेली आहे. अशा फॅक्टरीमध्ये कच्चा माल व तयार उत्पादने ठेवण्यासाठी फायर कॅबिनेट स्टोरेज असणे आवश्यक आहे. जे वर्क स्टेशनला काम करतात, त्यांनी लागेल जेवढाच कच्चा माल आणला गेला पाहिजे, असे कायदा सांगतो. ऑक्सिजन, इंधन व वाढलेले तापमान हे सगळे जर एकत्र आले तर आग लागू शकते. जे ज्वलनशील पदार्थ स्पार्क तयार करू शकतात, त्यामुळे त्याची साठवणूक, वापर व योग्य विल्हेवाट लावणे गरजेचे आहे.

# वैचारिक प्रबोधनासाठी साहित्य संमेलनाची गरज-खा.अशोकराव चव्हाण

### चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन; संमेलनाध्यक्ष डॉ. जगदीश कदम यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**नांदेड** – समाजामध्ये अनेक विचारधारा प्रसवत असतात. तसेच लोकांमध्ये वेगवेगळ्या समजुती असतात. मात्र, काही लोक तर चुकीच्या गोष्टी समाजात पसरवत असतात. साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून लोकांना योग्य दिशा देण्याचे काम केले पाहिजे. खरे तर वैचारिक प्रबोधनासाठी साहित्य संमेलनाची आवश्यकता असते असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांनी केले. ते मुदखेड शहरात भरलेल्या चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.




यावेळी अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. जगदीश कदम, स्वागताध्यक्ष प्रवीण गायकवाड, निमंत्रक प्रल्हाद हिंगोले, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टे, तहसीलदार आनंद देऊळगावकर, नपचे मुख्याधिकारी शैलेश फडसे, पोलिस निरीक्षक वसंत सप्रे, विस्तार अधिकारी सुरेश पाटील, माजी गटशिक्षणाधिकारी दिलीप सुपे, ओबीसी नेते सटवाजी माचनवार, कोमल जयस्वाल, गोविंदराव नागेलीकर, शंकर राठी, माधव कदम, प्रकाशक निर्मलकुमार सुर्यवंशी, कवी बी. जी. कळसे, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे आदींची उपस्थिती होती.

प्रज्ञादर्शन शिक्षण संस्था मुदखेड आणि सप्तरंगी साहित्य मंडळाच्या संयुक्त विद्यमाने चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन मुदखेड येथील रणछोडदास मंगल कार्यालयात करण्यात आले होते. साहित्य संमेलनाची सुरुवात ग्रंथ दिंडीने झाली. यात राजर्षी शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मुदखेड आणि युनिवर्सल हायस्कूल या शाळांतील विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला होता. ठिकठिकाणी सवाष्ण महिलांनी ग्रंथपूजन केले. उद्घाटन सत्राच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलन करून स्वागतगितानंतर कार्यक्रमास प्रारंभ झाला. पुस्तक प्रदर्शन आणि चित्र प्रदर्शनाचेही उद्घाटन झाले. प्रज्ञादर्शन शिक्षण संस्था आणि सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. त्यानंतर जनसंवाद २०२५ आणि मातोश्री भागाबाई डोंगरे यांच्या पुरस्कारांचे वितरण झाले. तसेच विशेषांक व पुस्तकांचे प्रकाशन झाले.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. कदम म्हणाले की, मोबाईलच्या वाढत्या आक्रमणामुळे माणसामाणसातील संवाद तुटत चालला आहे. हा संवाद राहिला तरच माणूस जिवंत राहू शकेल. अन्यथा माणूसकीचा प्रवाह आटून जायला वेळ लागणार नाही. समाजाच्या बोथट होत चाललेल्या संवेदना ताज्या करणे हे साहित्याचे काम आहे आणि जनसंवाद साहित्य संमेलन ते करीत आहे असे ते म्हणाले. निमंत्रक प्रल्हाद हिंगोले, स्वागताध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक पांडुरंग कोकुलवार यांनी केले. सूत्रसंचालन कैलास धुतराज तर आभार प्रज्ञाधर ढवळे यांनी मानले. या सत्राच्या यशस्वीतेसाठी सप्तरंगी साहित्य मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. या सत्रात रसिक प्रेक्षकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# राजधानीत मराठी साहित्य संमेलन ही अभिमानाची गोष्ट!

### संमेलनाच्या कार्यालयाचे मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते उद्घाटन



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**नवी दिल्ली** – दिल्ली येथे पार पडणाऱ्या '९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'च्या कार्यालयाचे उद्घाटन आज (३० जानेवारी) महाराष्ट्र सदन येथे करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन पार पडले. दरम्यान, २१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ रोजी साहित्य संमेलन पार पडणार आहे. मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी लोकसंस्कृती, संत साहित्याच्या अभ्यासक, संशोधक डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर प्रतिक्रिया देताना आनंद व्यक्त केला. ते म्हणाले की, जगभरातील मराठी माणसांकरिता एक अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे कि देशाच्या राजधानीमध्ये भव्य स्वरुपात साहित्य संमेलन होत आहे. साहित्य संमेलन यशस्वी होण्याकरिता ७० लोकांची टीम दिवस रात्र काम करत आहे. मुरलीधर मोहोळ कार्यवाहक म्हणून त्यांना मदत करत आहेत.

महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर पहिल्यांदा होणारे दिल्लीतील साहित्य संमेलन हे यशस्वी झाले पाहिजे या दृष्टीने आम्ही सर्व टीमच्या पाठीशी आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील साहित्य संमेलनात येण्याकरिता होकार दिला आहे. विशेष म्हणजे, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हे पहिले साहित्य संमेलन आहे. त्यामुळे मराठी जनतेमध्ये खूप उत्सुकता आहे आणि विचार प्रवर्तनाचे काम या संमेलनाच्या माध्यमातून होईल असा विश्वास असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दिल्लीतील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दिल्लीमध्ये परिवर्तन होणार आहे, तसे दिसत आहे, लोकांच्या मनामध्ये परिवर्तन आहे. १० वर्षांमध्ये जे अपेक्षित होते ते काही झालेले नाही, हे लोकांना दिसत आहे. त्यामुळे दिल्लीकर सातत्याने लोकसभेत मोदींना निवडतात, यावेळी विधानसभेवर मोदींचाच झेंडा लागावा अशी अपेक्षा लोकांची दिसत आहे.

## लक्षवेधी छायाचित्र....



वाह ताज......!

(छाया : संजय दारमवार, मुंबई)








– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...


## सुखासाठी सुखासनाचीच सुरुवात सुंदर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

प्रत्येकाची सुखाची व्याख्या निराळी असते. अर्थातच ती ज्याच्या त्याच्या अनुभूतीवर ठरत असते. कोण कशात सुख शोधेल ते सांगता येत नाही, समजूही शकत नाही. सुख म्हणजे नक्की काय असतं, हे ज्यानं त्यानं अनुभवल्या शिवाय कळू शकत नाही. सर्वांच्या नशिबात सुखाचा उपभोग लिहिलेला असतोच; ते काहींना ओंजळभर मिळतं, तर काहींना रांजणभर मिळतं. पण त्यांतून मिळणारा आनंद ज्याला कळतो तोच जगणे शिकतो. दुःखाच्या समुद्रात सुखाची लाट असतेच; फक्त थोडी वाट पहायची असते. विमानाला सुद्धा उडण्याअगोदर धावपट्टीवर वेगाची सीमा गाठण्यापर्यंत धावावंच लागतं, तेव्हा कुठे जाऊन ते आकाशांत भरारी मारू शकतं, उडू शकतं. आयुष्याचा सुद्धा हाच नियम आहे; सुखाच्या आकाशांत उडण्या अगोदर दुःखाच्या धावपट्टीवर सहनशीलतेची सीमा आपल्याला गाठवीच लागते, त्याच्याशिवाय आपण सहज आनंदाची भरारी घेऊ शकत नाही.

लहान सहान गोष्टीतही सुख, शोधलं तर सापडतं. सुख म्हणजे काय असतं तसं बघितलं तर आपण दैनंदिन जीवनांत नेहमीच अनुभवत असतो. जसं खूप दिवसापासून हरवलेली एखादी अत्यंत आवडीची वस्तू अचानक सापडते तेंव्हा, ट्रॅफिक जॅममध्ये आपण फसलेले असतो तेव्हा शेजारच्या गाडीतलं लहान मूल आपल्याकडे बघून गोड हसतं तेंव्हा, आकाशात पूर्ण गोल चंद्र दिसतो तेंव्हा जे काही अंतर्मनाला होतं ना त्यांतही अनोखे सुख सामावलेलं असतं. म्हणजेच सुख एखाद्या वास्तुसारखं दिसत नसलं तरीही आपल्याला मिळालेल्या सुखाची अनुभूती आपल्या चेहेऱ्यावर दिसू लागते. कमी अधिक प्रमाणात सर्वांच्याच वाटेला कष्ट, दुःख येत असतात, परंतू त्यावेळी मन प्रसन्न, आनंदी ठेवलं कि सुख आपोआप आपल्याला शोधत येतं. मन प्रसन्न आणि आनंदी ठेवण्यासाठी दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचाराने करण्याची जरुरी असल्याचं आपण समजून घेतलं पाहिजे.

## बाजी जिंकून देणारी माणसं ...




**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**(मागील अंकावरून)**


कल्पना करा की हनुमान, बिभीषण, सुग्रीव आदी मंडळी यांनी रामाला मदत केली नसती तर ? सत्याच्या मार्गावर चालणारा राम युद्ध जिंकला असता ? श्रीकृष्णाची मदत नसती तर धर्म आणि न्यायाच्या बाजूने चालणारे पांडव जिंकले असते ? नक्कीच जिंकले असते. पण ते जिंकणे त्यांच्यासाठी तेवढे सोपे राहिले नसते. त्यांना ती बाजी जिंकून देण्यात ही सगळी मंडळी मोलाचे साहाय्य करणारी ठरली. यात आपल्याला असेही म्हणता येते की जेव्हा तुमची बाजू न्यायाची, सत्याची असते, तेव्हा अशा शक्ती तुम्हाला साहाय्यभूत होण्यासाठी उभ्या ठाकतात.



आपण तर सर्वसामान्य माणसे. आपले आयुष्य म्हणजे एक लढाईच असते. या लढाईत आपल्याला पण आयुष्याची बाजी जिंकून देणारी माणसं भेटतात. कधी ती आईवडिलांच्या रूपात असतात, कधी भाऊ , बहीण नातेवाईक आणि मित्रांच्या रूपात असतात, कधी सद्गुरुंच्या रूपात असतात. आपल्याकडे ती दृष्टी मात्र पाहिजे. त्यांना ओळखता आले पाहिजे. आपले यश हे आपल्या एकट्याचे कधीच नसते. या सगळी व्यक्तींना जेव्हा आपण आपल्या यशात सहभागी करून घेऊ, तेव्हाच आपले यश शोभून दिसते. अशा व्यक्तींच्या बद्दल राखणे, कृतज्ञ राहणे आणि प्रसंगी त्यांचे उपकार स्मरून त्यांच्या उपयोगी पडणे हे आपले कर्तव्य असते.

आपल्यालाही दुसऱ्यांच्या आयुष्यात अशी बाजी जिंकून देणाऱ्या माणसांची भूमिका बजावता येईल का ? तसे आपण करू शकलो तर, त्यासारखी चांगली गोष्ट दुसरी नाही. कधी कधी आपला थोडासा मदतीचा हात, आपले दुसऱ्याला धीर देणारे दोन मोलाचे शब्द हे दुसऱ्या माणसांसाठी खूप महत्वाचे ठरू शकतात.

***



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

## कवीश्वर स्तवन

नमस्कार भक्तगण


मानवी जीवनात कवींना व साहित्यिकांना मोठे महव आहे कल्पनेची का होईना पण नवसंजीवनी निर्माण करून ऊत्तम आदर्श लोकांपर्यंत ठेवणे। चिरंतन मुल्याचे जतन करणे क्षीण व निराश लोकांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण करणे हे काम कवी व साहित्यिक करतात. प्रापंचिक माणसाच्या जीवनात तोचतोच पणा येऊन त्याचा अंतरीक विकास खुंटतो पण साहित्यिक त्याच्या अंतःकणात भगवत् भक्तीची ज्योत पेटवून प्रेमाचा अंकुर निर्माण करतात. त्याच्या सुक्ष्म शक्तींना सतेज करतात. हाच तो जगाचा ऊध्दार होय.तर कवी भेटणे म्हणजे परमेश्वर चा अलभ्य लाभच होय. जो न देखे रवी। वो देखे कवी।

मोठमोठ्या कवींनी ऊत्तम ऊत्तम काव्य रचली नसती तळ जगाचा ऊध्दार झाला नसता. म्हणून संपूर्ण मानवजातीला कवींचा मोठा आधार आहे.

समर्थाच्या मतेकवींचे मोठेपण खाली देत आहे.

१)कवी चातुर्याच्या मुर्ती असतात. प्रत्यक्ष ब्रहस्पती असतात. वेदश्रुतींना सुध्दा वाटते की आपण शब्दरूपाने त्यांच्या मुखातुन प्रगट व्हावे. २)कवी म्हणजे मनुष्य रूपाने प्रगट झालेली विवेकरछपी संपत्तघची कोठखरेच आहेत. कवीचे अंतरंग परमात्म वस्तुच्या विचारांनी गच्च भरलेले असते. कवी म्हणजे अत्यंत शुध्द अशा परब्रम्हाचे ऐश्वर्य होय.द्रुष्यविश्वाला अंतर्यामी पणाने सांभाळणारा जो विराट पुरूष त्याची ध्यानावस्था म्हणजे कवी. कवी म्हणजे अक्षय स्वानंदाने काठोकाठ भरलेली सुखाचे तारे जीवन प्रवाहात तरंगत असतात. अनेक योजना अनेक ऊद्योग सफल करण्यासाठी ही जहाजे सर्वांना ऊपयोगी पडतात. भगवंताच्या प्रेमाची कल्पना कवीच फक्त मांडू शकतो.

श्री राम जय राम जय जय राम



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नामाचे सूक्ष्म स्वरूप

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

नुसते राम राम म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य नोकरी नोकरी असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. रामनाम आणि नोकरी यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. राम राम म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा राम राम म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरूद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण राम राम म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे नोकरी नोकरी असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण राम राम म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चित आहे याचा अनुभव सर्वांना आहे. राम राम म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा नोकरी नोकरी म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच राम राम म्हणून राम मिळणे निश्चित आहे. सबब राम राम म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता राम राम जपावे.

मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच; प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. मी पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

११. जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## घराची निंदा करु नये

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

जरा वेगळे वाटते ना? पण आपण स्वतःशी थोडा विचार केला तर किंवा काही लोकांचे बोलणे ऐकले तर आपल्याला लक्षात येते, की घराला सहज नावे ठेवली जातात. किंवा काही मंडळी इतरांच्या घराशी आपल्या घराची तुलना करतात आणि घरी बोलावण्याचे टाळतात.

आज आपण हा विचार करु या. आपण जेथे राहतो त्या घरात आपल्याला कसे वाटते. या घराने आपल्याला काय काय दिले? आपली किती सुख दुःखे आपल्या बरोबर अनुभवली आहेत? आपल्याला किती संरक्षण,आधार दिला आहे. लहान मुलांना तर स्वतःचे घर खूप प्रिय असते. लहान मुले वैश्विक शक्तीशी जोडलेली असतात. घरातील चांगली ऊर्जा त्यांना समजते. आपल्याला घर निर्जीव वाटत असेल तरी त्यालाही भावना असतात. ते आपल्याशी बोलते. जसे आपण नवी खरेदी केली की आपल्याला आनंद होतो तसेच घरही प्रसन्न होते. घराची स्वच्छता केली, रंग दिला किंवा घरातील वस्तूंच्या जागा बदलल्या तरी आपण म्हणतो ‘‘घराची ऊर्जा बदलली आहे.‘‘ घरात छान प्रसन्न वाटत आहे. असे बरेच प्रसंग आपल्याला आठवतील. घराची विविध रुपे आपण अनुभवतो. पण लक्षात घेत नाही. आणि कधी कधी घराची निंदा करतो. अगदी सहज या घराने मला काय दिले? असे वैतागाने म्हणून जातो. त्यावेळी घर नाराज होते. आपले पूर्वज कायम म्हणतात, ‘‘वास्तू नेहेमी तथास्तू म्हणत असते. म्हणून चांगले बोला‘‘ आपले पूर्वज फार महत्वाचे सांगत होते. त्यांचे सगळे सांगणे शास्त्रावर आधारित होते. त्यामुळे ‘‘घराची निंदा करु नये.‘‘ हे खूप महत्वाचे वाटते. या. साठी पुढील काही संकल्प महत्वाचे वाटतात.

‘‘घरासाठी संकल्प‘‘ घरात सगळेजण देवाचे करतात.पोथी वाचन अनेक वर्षे सुरु आहे. घरात सुबत्ता आहे.सर्व भौतिक सुविधा आहेत.हे सगळे असले तरी एखादा छोटासा किंतू असतो. आणि सर्व सुखांच्या आड येणारे हेच असते.थोडक्यात म्हणजे सगळे उत्तम आहे,पण..... असे ऐकू येते.आणि हा पण म्हणजे पाणी साठ्यातून जसे पाणी झिरपते तसे असते. तर या झिरपणाऱ्या पाण्याला/पणला /किंतूला दूर करु या. या साठी काही गोष्टी करु या.

आपण देवपूजा,पोथी वाचन आरती किंवा अजून काही करत असू तर ते उत्तमच आहे. पण एक असे असते या सगळ्याची ठराविक वेळ असते.त्या वेळी आपले विचार अत्यंत उत्तम,सकारात्मक असतात.पण हे सगळे झाल्यावर नंतर पुन्हा असे विचार कधी करतो? याचा विचार प्रत्येकाने करावा.या गोष्टी आपण दिवसातून एकदा किंवा दोनदा करतो.पण आपण पाणी पिणे,चहा घेणे,जेवणे,झोप घेणे अशा आणि काही आवश्यक गोष्टी वारंवार करतो.मग आपल्या कुटुंबा विषयी असे सकारात्मक विचार ( संकल्प ) सुद्धा सतत करायला हवेत.

घरातील व्यक्ती एकमेकांशी मैत्रीपूर्ण वागणे.आनंदाने संवाद करणे,एकमेकांमचा सर्वांनी स्वीकार करणे या साठी काही संकल्प पुढील पद्धतीने करु या. कोणतीही पद्धत किंवा जमेल त्या पद्धती वापराव्यात. घरात दर्शनी भागात सर्व सदस्य असतील असा फोटो लावणे. म्हणजे आनंदी फॅमिली फोटो घरात लावावा.

काही सकारात्मक वाक्ये नेहेमी उच्चारावीत. ही वाक्ये पुढील प्रमाणे.

आमचे घर हे एक पवित्र मंदिर आहे.

मी व घरातील प्रत्येक व्यक्ती पवित्र व शक्तिशाली वैश्विक शक्तीचा अंश आहेत.

सगळे सुखी व आनंदी आहेत.

सगळे एकमेकांना समजून घेत आहेत.

सगळ्या सदस्यांचे एकमेकांशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत.

घरातील प्रत्येकाला त्यांच्या मनाप्रमाणे सुख व समाधान मिळालेले आहे.

आम्ही सगळे कायम एकमेकांच्या सोबत आहोत.

अशा घरात व घरातील सदस्यांच्या सोबत मी रहात आहे.त्या साठी देव/निसर्ग शक्ती / वैश्विक शक्ती यांचे मनापासून आभार!



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

व्यालं बालमृणालतन्तुभिरसौ रोद्धुं समुज्जृम्भते
छेत्तुं वज्रमणिं शिरीषकुसुमप्रान्तेन सन्नह्याते।
माधुर्यं मधुबिन्दुना रचयितुं क्षाराम्बुधेरीहते
नेतुं वाञ्छति यः खलान्पथि सतां सूक्तैर्सुधास्यन्दिभिः ।।

अर्थ – ज्याप्रमाणे कमळदंडाच्या कोमल तंतूंनी उन्मत्त हत्तीस पकडण्याचा प्रयत्न, शिरीष फुलाच्या पाकळीने हिरा छेदण्याचा प्रयत्न, मधाच्या एका थेंबाने खा–या पाण्याचा समुद्र मधुर करण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे, त्या प्रमाणे दुष्टांना अमृतवर्षी सुभाषितांच्या द्वारे सन्मार्गावर आणण्याची इच्छा व्यर्थ आहे.

कविराज भर्तृहरी या श्लोकात स्पष्टपणे सांगतात की, दुर्जनांना उपदेश करून सरळ मार्गावर आणण्याचा प्रयत्न जर कोणी करीत असेल, तर ते व्यर्थ होय. हा आशय सांगताना कवींनी काही उदाहरणे दिली आहेत. कमळदंडाचा तंतु हा त्याच्या कोमलत्वासाठी प्रसिद्ध आहे.

शिरीष फूलाची पाकळी देखील तिच्या कोमलत्वासाठी प्रसिद्ध आहे. तर मधबिन्दूची माधुर्याची ख्याती आहे. पण या तिघांच्याही द्वारे क्रमशः उन्मत्त हत्तीस पकडणे, हिरा छेदणे, समुद्र मधुर करणे शक्य नाही. अगदी त्याचप्रमाणे केवळ सुवचनांचा उपदेश करून दुर्जनांना सन्मार्गावर आणण्याची इच्छा करणे म्हणजे भाबडेपणा होय. असे साध्य करणे सोपे नाही.




## शुद्ध देशी गाईचे तूप

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

वजन कमी करण्यासाठी अनेक जण डायटिंग सुरू केल्यानंतर सर्वात पहिले तुप खाणे बंद करतात. या पाठीमागचे त्यांचे कारण तुप खाल्ल्यामुळे वजन वाढते. पण तसे बिलकूल नाही. देशी तुपामुळे आपला मेंदू आणि शरीर तंदुरूस्त राहण्यास मदत होते. काही आजारांमध्ये डॉक्टरांतर्फे तुप खाण्याचा सल्ला दिला जातो. पण हा सल्ला सर्वच रुग्णांना देण्यात येत नाही. आज तुम्हाला देशी तुप खाल्ल्यामुळे काय फायदे होतात हे सांगणार आहोत.

देशी तुपाचे फायदे–

देशी तुपामध्ये शॉर्ट चेन फॅटी ऍसिड असते त्यामुळे हे पचण्यास एकदम हलके असते.

यामध्ये व्हिटॅमिन ए, डी आणि कॅल्शियम, फॉरस्फोरस, मिनरल्स, पोटॅशियम या सारखे अनेक पोषक तत्व देखील उपल्ब्ध असतात.

देशी तुप खाल्ल्यामुळे सांधेदुखीचा त्रास कमी होण्यास मदत होते.


देशी तुपाने डोक्याची मालिश केल्यामुळे केस लवकर पांढरे होत नाही तसेच त्वचेमध्ये चमक येण्यास मदत होत

रोज शुद्ध तुप खाल्ल्याने वात आणि पित्त शांत राहण्यास मदत होते.

शुद्ध तुप खाण्याने पचन क्रिया उत्तम राहते.

मुलांच्या जन्मानंतर शरीरातील वात वाढ होते. त्यासाठी शुद्ध तुप खाल्ले पाहिजे.

हृदयाच्या नलिकांमध्ये ब्लॉकेज असल्यास तुप लुब्रिकेंटचे काम करते.



गॅसेसचा त्रास कमी करण्यासाठी तुप खुप फायदशीर आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शरीरातील पित्त वाढते ते कमी करण्यासाठी तुपाचे सेवन करावे.

डाळी शिजवतांना तुप टाकल्याने गॅस होण्याचा त्रास कमी होतो.

तुपामुळे डोळ्यांवर पडणारा ताण कमी होण्यास मदत होते.

त्वचा आणि केसांसाठी उपयुक्त –

शुद्ध तुपामुळे स्किन सॉफ्ट जातात आणि त्वचा मॉयश्चराइज होते.

स्किन नरिश करण्याबरोबर त्वचेतील ड्रायनेस कमी करण्यास मदत होते. शुद्ध तुपाने चेह–याचे मसाज करणे उत्तम असते.

केस चमकदार आणि मऊ बनवण्यासाठी डोक्याला शुद्ध तुपाने मालिश करावी. यामुळे केस काळे, दाट आणि मजबूत होण्यास मदत होते.

भाजलेल्या अथवा शरीरावरील जखमेची खुण कमी करते.

हृदयासाठी–

शुद्ध तुपाच्या सेवनामुळे बॅड कोलेस्ट्रॉलची लेव्हल नियंत्रणात राहते. तसेच चांगले कोलेस्ट्रॉल वाढवण्यास मदत करते.

शुद्ध तुपामध्ये व्हिटॅमिन के असते. यामुळे ब्लड सेलमध्ये जमलेले कॅल्शियम नष्ट करण्याचे काम करते. यामुळे ब्लड सर्कुलेशन उत्तम राहते.

शुद्ध तुपाच्या सेवनामुळे इम्यून सिस्टिम मजबूत होण्यास मदत होते. यामुळे इन्फेक्शनमुळे होणा–या आजारांशी लढण्यास ताकद मिळते.

शुद्ध तुपामध्ये सूक्ष्म जीवाणु, ऍन्टी–कँन्सर आणि एँटी–व्हायरल एजेंट उपलब्ध असते. यामुळे अनेक आजारांशी लढा देण्यास मदत होते.

डायजेस्टिव्ह सिस्टीम उत्तम करण्यास मदत करते.

शुद्ध तुपाच्या सेवनामुळे शरीरात जमा फॅट पातळ करून त्याचे व्हिटॅमिनमध्ये रूपांतरण करण्याचे काम करते.

यामुळे खाल्लेले अन्न लवकर डायजेस्ट होते आणि मेटाबॉल्जिम उत्तम राहण्यास मदत होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## ।। श्री स्वामी समर्थ ।।




**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


स्वामी म्हणतात – एखादा व्यक्ती एखाद्या कल्पनेसाठी मरतो, परंतु ती कल्पना, त्याच्या मृत्यूनंतर, एक हजार जीवन ती देईल.

एखाद्याची सर्वात मोठी चूक म्हणजे त्याचे वास्तविक स्वरुप ओळखणे नाही, आणि केवळ आत्मज्ञान आत्मसात केल्याने ते सुधारले जाऊ शकते.

ज्या दिवशी तुम्ही हसला नाहीत तो दिवस फुकट गेला असे समझा.

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## किती वेळ आहे अजून

ज्योतिर्मय साहित्य

**(मागील अंकावरून)** टागोर कुटुंबातील व्यक्तींनी आपल्या घरातील मुली नाचवणे म्हणजे तत्कालीन समाजाच्या दृष्टीने फार मोठा अपराध होता. टागोर कुटुंबीय मात्र असे मानत नव्हते. मुलींना, महिलांना सुद्धा सगळ्या कला शिकण्याची संधी दिली पाहिजे, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होऊन ते समृद्ध झाले पाहिजे असाच त्यांचा दृष्टिकोन होता. सुधारक म्हणून प्रौढी मिरवायची आणि घरातील महिलांचा सन्मान करायचा नाही असला दांभिकपणा त्यांच्याजवळ औषधालाही नव्हता. स्वतः टागोरांनी आपल्या एका मुलाचे लग्न एका बालविधवेशी लावून दिले होते आणि आपल्या आधुनिक विचारांचा परिचय दिला होता. त्यांचे सुधारणावादी विचार फक्त बोलण्यापुरते नव्हते. तर त्याप्रमाणे वागणारे ते आणि त्यांचे कुटुंबीय होते. पण त्या काळातील लोकांना टागोर कुटुंबियांचे असे वागणे धर्मद्रोह वाटत होते. त्याची परिणीती टागोर कुटुंबियांना वाळीत टाकण्यात झाली होती.

# गुलाब अन् काटे...!

ज्योतिर्मय साहित्य

शाळेची निसर्ग सहल शाळेपासून जवळ असलेल्या फुलझाडांच्या उदयानात गेली. शाळेतील मुले-मुली उदयानात चोहीकडे फिरू लागली. उदयानात अनेक प्रकारची फुलांची झाडे होती. फुलांचा सुवास उदयानात चोहीकडे दरवळत असल्याने उदयानातीत वातावरण अगदी मनाला प्रसन्न करणारे होते. विनय आणि अब्दूल हे दोघेजण शिक्षकांची नजर चुकुवून गुलाबांची टवटवीत उमलेली लाल-पांढरी, पिवळी फुले घाईघाईत तोडता-तोडता त्या दोघांच्या हातांच्या बोटातून गुलाबाच्या झाडाला असलेले टोकदार कोटे टोचली गेल्याने बोटातून रक्त निघत होते. ते जोशीसरांनी पाहिले आणि लागलीच त्यांनी जवळ असलेल्या दस्ती फाडून दोघांच्या बोटाला बांधली. आणि रक्त येण्याचे थांबले व वेदनाही कमी होऊ लागले.



बाल साहित्य

अय्युब पठाण लोहगावकर
पैठण मो.९७६४३ ५०३७४

हे सर्व दृश्य सवितासह संपूर्ण मुला-मुलींने पाहिले. सर्व विद्यार्थी उदयानात फिरून झाल्यावर जोशीसरांनी सांगितल्याप्रमाणे उदयानातील एका डेरेदार झाडाखाली बसले व आपापले डबे काढून जेवण केले. थकल्यामुळे सर्वांना चांगलीच भूक लागली होती. पोटभर जेवण झाल्यावर उदयानातील नळावर पाणी पिले. सरांच्या आदेशाप्रमाणे पुन्हा झाडाखाली सर्व विद्यार्थी येऊन बसले. जोशीसर सर्व प्रकारच्या फुलझाडांची माहिती सांगू लागले. " बागेत, कोणीही झाडांना अथवा फुले तोडू नये, असे फलक असतांनादेखील विनय व अब्दूल ने गुलाबांची फुले तोडली. त्यांची शिक्षा त्यांना मिळालीसुध्दा आहे." मध्येच सविता म्हणाली, " सर, इतर फुलांच्या झाडांना काटे नसतात, परंतु गुलाबाच्या झाडा-फांदयांना काटे का असतात ? " यावर जोशीसरांने गुलाबाच्या झाडांची मजेशीर गोष्ट सांगायला सुरुवात केली.

" मुलांनो फार-पूर्वी गुलाबाचे झाडदेखील जाईजुई, मोगरा-चमेलीच्या झाडाप्रमाणे होते.त्याला काटे नव्हते. असेच टारगट मुले फुलझांडाच्या जवळ जाऊन त्यांना आलेली टवटवीत गुलाबाची फुले ओरबडायची, कळ्या-पाकळ्या चुरगाळून बाजूला फेकून दयायची. हे त्या टारगट मुलांकडून फुलांच्या मोसमात नेहमीच घडायचे. फुलंझाडे त्यांच्या या दृष्ट कृतीने अगदी वैतागून गेले होते. झाडाना-फुलांना वेदना होत होते. पण त्यांना बोलता कुठे येत



होते? टारगट मुलांच्या नेहमीच्या या दृष्ट वागण्याने फुले-झाडे कंटाळून गेली होती. त्याचा सर्वात जास्त त्रास गुलाबाच्या फुलांना व झाडांना व्हायचा. मग एके दिवशी गुलाबांच्या झाडांनी वनदेवीची भक्ती-प्रार्थना केली आणि आपली करूणा भाकली. वनदेवी गुलाबांच्या फुल- झाडांची भक्ती पाहून प्रसन्न झाली. वनदेवीपुढे गुलाबांच्या फुल-झाडांनी टारगट मुलांपासून झालेला त्रास व समस्या सांगितली. वनदेवी म्हणाली, " ठिक आहे.

उदयापासून टारगट मुलेच काय, पण तुम्हाला व तुमच्या फुलांना कोणीच ओरबाडणार नाही."


सूर्य उगवण्या अगोदर आश्चर्य घडले गुलाबाच्या झाडा-फांदयांना टोकदार काटे आले. टारगट मुले फुले तोडण्यास- ओरबडण्यास पुन्हा आली. इतर फुले तोडता-तोडता त्यांनी गुलाबाचे टवटवीत सुंदर फुले ओरबाडताच त्यांच्या बोटे रक्त भंबाळ झाली. त्यांना खूप वेदना होऊ लागल्या. ते गुलाबाच्या फुल-झाडापासून घाबरून पळून गेले. वनदेवीच्या कृपेमुळे तेव्हापासून टोकदार काटेच गुलाबाच्या फुलांचे रक्षण करू लागले. ते आज पर्यंत आहे." सर्वांनी जोशीसरांकडून गुलाब फुल- झाडांची मजेशीर गोष्ट ऐकली व सर्व विद्यार्थी शाळेकडे निघाले.

***

# बालकांची जडणघडण व व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त लेट्स अचिव्ह

ज्योतिर्मय साहित्य

लक्ष्मण जगताप यांच्या लेट्स अचिव्ह या पुस्तकात मुलांना उत्तम शिक्षण देण्याबरोबरच ते शिक्षण कसं आत्मसात केले पाहिजे याचा विचार लेखकांनी केला आहे. मुलाचा व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी शिक्षणाबरोबर इतर अनेक गोष्टींची आवश्यकता असते. या गोष्टीकडे पालक सहसा लक्ष देत नाहीत. इतर पूरक गोष्टी किती महत्त्वाच्या आहेत याची जाणीव हे पुस्तक वाचल्यानंतर होते. परीक्षेत यश मिळवणे जितके महत्त्वाचे आहे तितके आपले मूल समाजात एक उत्तम नागरिक म्हणून त्याने कसं असावे हे सुध्दा महत्त्वाचे आहे.




आपल्या मुलाने उत्तम गुण मिळवले पाहिजे अशी प्रत्येक पालकाची अपेक्षा असते. पण हे गुण मिळवताना मुलाची क्षमता व मनाची अवस्था समजावून घेणे गरजेचे आहे. प्रत्येक मुल एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. त्याला भाव भावना असतात, त्याच्या काही क्षमता असतात. याचा विचार पालक करीत नाहीत. मुलं घडत असताना ज्या गोष्टी करणे गरजेचे आहे त्या गोष्टीविषयी खूप छान मार्गदर्शन यात केले आहे. पालक आणि मुले यांच्या अनेक बाजू यात मांडल्या आहेत.

पुस्तकाची प्रस्तावना किशोर बालभारतीचे संपादक किरण केंद्रे यांनी लिहिली असून पाठराखण शिक्षण व मेंदूतज्ञ डॉ. श्रुती पानसे यांनी केली आहे. जीवनात काहीतरी मिळवण्याचं प्रत्येकाचं ध्येय असते. ते ध्येय साकार करण्यासाठी मूल आणि पालक दोन्ही प्रयत्नशील असतात. त्यात मुलांची भूमिका कशी असावी आणि पालकांची भूमिका कशी असते या दोन्ही बाजू समजावून घेणे गरजेचे असते. बऱ्याच वेळा अनेक पालक केवळ एकांगी विचार करतात आणि अपेक्षेने अनावश्यक ओझे मुलांवर लादत असतात. त्यामूळे त्या अपेक्षेच्या ओझ्याने मुल घडण्या ऐवजी वेगळेच काहीतरी होण्याची शक्यता असते. त्यासाठी प्रत्येक पालकाने मूल समजावून घेतले पाहिजे. मूल समजावून घेणे हे किती गरजेचे आहे याची प्रचिती हे पुस्तक वाचून येणार आहे.



पुस्तक परीक्षण

प्रा. कुंडलिक शांताराम कदम
तळेगाव ढमढेरे, शिरूर. पुणे

मुले आणि पालक यांच्यात योग्य समन्वय साधण्याचा प्रयत्न या पुस्तकाच्या माध्यमातून केला आहे.

पालक आणि मुले यांच्या दोन्ही बाजूचा विचार यात मांडला आहे. लेखक शिक्षक असल्याने मुलांचे बालमानसशास्त्र त्यांना चांगले अवगत झाले आहे. मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक गोष्टी बाबत यात त्यांनी एक वैचारीक आणि अनुभवजन्य मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाला समुपदेशनाची जोड आहे. त्यामूळे यातील लेखांची उपयुक्तता सिद्ध झाली आहे.

या पुस्तकात मुलांसाठी काही उपयुक्त गोष्टी सांगितल्या आहेत. त्यात आरोग्य, छंद, वाचन, श्रम, नीटनेटकेपणा, सकारात्मक विचार, अभ्यास करण्याचे तंत्र, जिद्द, यश, अपयश,व्यवहारज्ञान, वाचन, पुस्तक मैत्री, परीक्षा, मस्तपणे जीवन कसं जगावं, जीवनातील खेळाचे महत्व, सुट्टी, मित्र, वक्तृत्व, विज्ञान यासारख्या अनेक विषयावर चिंतन मनन करून लेख लिहले आहेत.

मुले म्हणजे देवाघरची फुले, मुले म्हणजे यंत्र नव्हेत, मुले हिंसक का बनत आहेत, मुलांचे ऐका, शिक्षणाचे माध्यम, प्रेमाचा अर्थ, अति स्तुती, मार्क्स देणारे मशीन यासारख्या अनेक लेखातून मार्गदर्शन आणि प्रबोधन केले आहे.

लहान असताना वडाच्या झाडाला खेळलेल्या सूर पारंब्या, आबंट चिंचा व बोरे खाताना आलेली मजा तर काही निराळीच असते. आईच्या कडेवर आणि बाबांच्या पाठकुळीवर बसण्यात मिळालेले सुख मिळते हे मोठेपणी कशातच मिळत नाही. लहानपणी शाळेतील मित्रांबरोबर खेळण्यात मिळालेल्या आनंदाची सर मोठे झाल्यावर कितीही खेळले तरी त्याला नाही.

मुले म्हणजे देवाघरची फुले या लेखातील हा एक छोटासा भाग आहे. लेखक लेखन करत असताना केवळ फक्त मार्गदर्शकाची भूमिका बजावत नाहीत तर जीवन समृद्ध कसं होत याविषयीं लिहताना खरं जीवन, बालपण कसं असावे याविषयीं एक ललित गद्य वाचावे असेच लेखन करून प्रत्येकाच्या बालपणाचं मोरपीस अंगावर फिरवतात.


वाचन संस्कृती आणि वाचन माणसाच्या जडण घडणीत किती उपयुक्त आहे याविषयी वाचनविषयी आणि पुस्तकविषयक लेखात लिहताना ते लिहतात, अनेक संस्कारांपैकी महत्त्वाचा असणारा संस्कार म्हणजे वाचन होय. लहान मुलांच्या बाबतीत तर त्याचे खूप महत्त्व आहे. बाळाच्या भरण पोषणासाठी आईचे दूध महत्त्वाचे असते. तितकेच महत्त्व मुलांच्या संस्कारासाठी वाचनाचे आहे. झाडाला खत पाणी वेळेवर दिले की ते चांगले वाढते, बहरते, फुलते. त्याप्रमाणे वाचनाने मुलांचे व्यक्तिमत्त्व आकारास येते. बोधकथा, संस्कारकथा, रहस्यकथा, बिरबल बादशाहाच्या कथा, आत्मचरित्रे इ. वाचल्याने मुलांच्या जडणघडणीवर मोठा सकारात्मक परिणाम होतो. शब्दसंपत्तीत वाढ व भर पडते. याचा फायदा म्हणजे वक्तृत्वकला आणि लेखनकला उत्तम प्रकारे विकसित होते. एकंदरीत त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होण्यासाठी वाचन एखाद्या टॉनिकप्रमाणे काम करते.अशा सगळ्या मुद्यांना स्पर्श करणारे हे पुस्तक मुले व पालकवर्गाला निश्चितच उपयुक्त आहे.

प्रा. कुंडलिक शांताराम कदम
तळेगाव ढमढेरे. शिरूर. पुणे
पुस्तकाचे नाव- लेट्स अचिव्ह
लेखक- लक्ष्मण जगताप
प्रकाशक- परीस पब्लिकेशन पुणे
मूल्य -२००रु.

# तो क्षण अमृताचा

मुंबईतील बांद्र्यासारख्या सुखवस्तू उपनगरात मनोरंजन क्षेत्रातील ऑफिस, संध्याकाळ होत आलेली प्रत्येकजण दिवसभराचे काम आटोपून घरी जाण्याचा तयारीत तेवढ्यात ऑफिस बॉय निरोप घेऊन आला की साहेबांनी अर्जंट मीटिंग बोलावली आहे म्हणून. सगळे पटापट कॉन्फरन्स रूम जमा झाले. इव्हेंट आणि एंटरटेनमेंट कंपनीत हे नेहमीचेच म्हणून बऱ्याच जणांनी कुजबुज सुरू असताना साहेबांचे कॉन्फरन्स रूम मध्ये आगमन झाले. वातावरण एकदम शांत, "मी तुम्हां सगळ्यांना अर्जंट बोलावले कारण मला आताच ठाण्याहून आ. प्रताप सरनाईकांचा फोन आला, त्यांना ठाण्यात मा. दीनानाथ मंगेशकर पुरस्काराचा कार्यक्रम आयोजित करायचा आहे. बराच वेळ ते कार्यक्रमाविषयी सविस्तर सांगत होते. ठाण्यातील मा.दीनानाथ मंगेशकर पुरस्काराचा कार्यक्रमाचे ब्रीफ घेण्याकरिता माझी व अजून एक सहकारी राज चौहान निवड करण्यात आली. आम्ही तात्काळ बांद्र्याहून ठाण्याला आ. प्रताप सरनाईकांच्या ऑफिसात पोहचलो तिथे अजून दोन-चार त्यांचे सहकारी वाट बघत होते. आम्ही सगळे मिळून त्यांच्या विहंग हॉटेलला कार्यक्रमयाच्या नियोजना करीता पहिली मिटिंग घेतली. कार्यक्रमाचा आराखडा बनविता बनविता बरीच रात्र झाली.

दुसऱ्या दिवशी आम्ही मंगेशकर कुटुंबाच्या " प्रभुकुंज " ह्या निवासस्थानी कार्यक्रमाची रूपरेषा समजून घेण्याकरिता भेटण्याचे ठरविले. आम्ही ठरलेल्या वेळी प्रभुकुंजवर पोहचलो. आज आपल्याला प्रत्यक्ष दर्शन होणार ह्या कल्पनेने मी अक्षरश भारावून गेलो होतो. घरापासून ते महालक्ष्मी च्या प्रवासात माझ्या मनात एकच विचार भारताची गानकोकिळा, गॉड गळ्याची गायिका आता प्रत्यक्षात कशा दिसत असतील? कशा बोलत असतील ? कारण आज पर्यंत मी त्यांना फोटोत व दुर्दर्शनवरच बघितले होते. मी कधी स्वप्नातही कल्पना केली नव्हती की लताजींना प्रत्यक्ष भेटेल, मुंबईत आल्यानंतर कामाच्या निमित्ताने अनेक दिग्गज हिंदी व मराठी कलाकार कलावंतांना भेटायचं योग्य आला पण लताजींना भेटायची एवढी उत्सुकता मला कधीच नव्हती. टॅक्सी महालक्ष्मीच्या दिशेने धावत होती, मी लताजींची एकाहून एक सरस गाणी आठवत ,गुणगुणत एकदाचा प्रभुकुंजवर पोहचलो. माझा सहकारी राज चौहान व आ. प्रताप सरनाईक यांचे सहकारी आधीच तेथे पोहचले होते. मुंबईतल्या अतिशय उच्चभ्रू वस्तीत मुख्य रस्त्यावर जास्त डामडौल नसलेली, सुंदर रंगसंगती असलेली प्रभुकुंज ही चार-पाच मजली भव्य इमारत. बाजूला हाजी-अलीचा दर्गा , समोर महालक्ष्मी मंदिर,






संजय पाटील

हिरा-पन्ना मार्केट, एअर कंडिशन मार्केट, एक रस्ता ताडदेव कडे जाणारा. प्रभुकुंजच्या तळमजल्यावर एक छोटासा हॉल वजा मिटिंग रूम. आम्ही सगळे प्रतीक्षा करीत असताना निरोप आला कि आज लताजी काही कारणास्तव भेटू शकत नाही मग आम्ही सगळी चर्चा बाळासाहेब हृदयनाथ मंगेशकर यांचे चिरंजीव आदिनाथ मंगेशकर यांच्याशी केली. कार्यक्रमाचा प्रथम आराखडा समजावून सांगता सांगता बराच उशीर झाला होता. आज लताजींची भेट झाली नाही म्हणून मी हिरमुसलो होतो.

मी महाराष्ट्रातील एका लहानशा खेड्यात जन्मलेलो. मला समजायला लागल्यापासून रेडिओवरची गाणी ऐकत असतांना जी गाणी पुन्हा पुन्हा ऐकावीशी वाटायची ज्यावेळी समज पण नव्हती गाणी कोण गातो? कुठून गातो?. गावात ग्रामपंचायत ऑफिसबाहेर लाऊडस्पीकरचा भोंगा लावलेला असायचा व आत ऑफिसमध्ये मोठा रेडिओ, त्याची मोठी मोठी बटणे व फिरणारी पट्टी हे सगळे मी दररोज बाजूच्याच असलेल्या शाळेच्या वर्गातून पाहत असे. दिवसभरातून दोन वेळा रेडिओवर बातम्या चालू झाल्या की गावातील जाणकार मंडळी जमायची.मला बातम्यांमधले तर काही समजायचे नाही पण बातम्या संपल्या की गाणी वाजवायची ती म्हणजे सुगमसंगीत, भावसंगीत, नाट्यसंगीत व चित्रपटसंगीत हे नंतर जाऊन समजलं तो पर्यंत मी हळूहळू चित्रपट संगीताचा चाहता होत चाललो होतो, त्या काळी गाणी ऐकण्याकरिता फक्त दोनच साधने उपलब्ध होती एक म्हणजे रेडिओ आणि दुसरे गावात वर्षाकाठी एकदा येणारा तमाशा.

गावात हळूहळू एक दोन जणांकडे रेडिओ आला. एक पानाच्या टपरीवाल्याकडे व दुसरा किराणा दुकानदार वाण्याकडे पण मला जवळचा वाटला तो पानटपरीवाला कारण त्याच्याकडे कितीही वेळ थांबले तरी तो हुसकावयचा नाही, त्या मानाने दुकानदार वाणी खडूस होता व त्याच्या गाण्यांची वेळ व आवड पण संकुचित होती, पानाच्या टपरीवर दिवस उजाडल्यापासून रात्री उशिरापर्यंत रेडिओवर गाणी वाजत असायची, विविध भारती, रेडिओ सिलोन व अजून ही इतर. मला जसजशी चित्रपट संगीताची आवड निर्माण होत चालली तस मी आता गाणी लक्ष्य देऊन ऐकू लागलो, गाण्याचे गीतकार कोण ? संगीतकार कोण ? गायक, गायिका कोण ? अनेक नावे कानावर पडायला लागली. त्यातीलच स्व. मुकेश, महमद रफि, किशोर कुमार मन्नाडे, तलत मेहमूद, शमशाद बेगम, गीता दत्त,महेंद्र कपूर, एस डी बर्मन, आर डी बर्मन, हेमंतकुमार, आशा भोंसले आणि एक नाव जे सारखं कानावर पडायचं ते म्हणजे लता मंगेशकर गान सरस्वती लता मंगेशकर यांच्या विषयी मी बरीच माहिती संकलन करायला लागलो होतो, जगातल्या अनेक आश्चर्यांपैकी एक म्हणजे भारतरत्न गान कोकिळा लता मंगेशकर, भारतीय जनमानसावर लता मंगेशकर नावाचे गारुड निर्माण झाले होते.

लता मंगेशकर यांचा जन्म मध्यप्रदेशातील इंदोर येथील मराठी भाषा बोलणारे गोमंतक मराठा कुटुंबात २८सप्टेंबर १९२९ साली झाला. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे एक शास्त्रिय गायक आणि रंगमंच अभिनेते होते. लता मंगेशकर १३ वर्षाच्या होत्या तेव्हापासून त्यांच्या अंगावर संपूर्ण कुटुंबाचा उदर निर्वाह करण्याचा फार मोठा भार कारण त्यांचे वडील मा.दववनाथ मंगेशकर यांचे हृदयविकाराने निधन झाले.अतिशय खंबीर असलेल्या लताजींनी अशा गंभीर परिस्थीवर मात केली. १९४५ साली लताजी कोल्हापूर सोडून मुंबईत आल्यात त्यावेळी त्यांचे वय फक्त १५ वर्ष होते. लता मंगेशकर हे नाव त्यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश करतांना धारण केले त्यांचे खरे नाव हेमा हार्डीकर. भावबंधन ह्या नाटकातील लतिका ह्या लोकप्रिय पात्रावरून त्यांचे नाव लता ठेवण्यात आले त्यांचे मूळ गांव गोव्यातील मंगेशी म्हणून मंगेशकर. (क्रमशः)



# गोफ नात्यांचा

**ज्योतिर्मय साहित्य**

निसर्गरम्य परिसरात असलेल्या डोंगराच्या कुशीत वसलेल्या एक छोट्याशा गावात अरविंद त्याच्या आईवडीलासोबत सुखासमाधानाने राहत होता. अरविंदचे



बाबा काहीतरी छोट्याशा आजाराचे गंभीर रुपांतर होत ते अचानक वारले. तेव्हा अरविंद बारा तेरा वर्षांचा असेल..... छोट्या गावात कसं होणार? त्याच्या शिक्षणाचा मोठा प्रश्न होताच.... आता आई आणि मुलगा दोघेच कसे राहणार? याचीच अरविंदच्या मामाला सतत चिंता वाटत होती. वडील गेल्यानंतर अरविंद च्या मामाने अरविंदच्या आईला जागा बदल म्हणून मामा त्याच्या गावाला घेऊन आला पण मामाने ठरवले होते की दोघांना परत गावी पाठवायचे नाही आपल्या स्वतःजवळ ठेवून घेतलं.

अतिशय बोलका, प्रेमळ, स्वाभिमानी, बाणेदार स्वभावाचा अरविंद मामामामीला खुप आवडायचा...मामीचा तर लाडका....मामीने तर त्याला मनोमन जावईच मानलं होतं.

अरविंद पेक्षा दोन वर्षांनी लहान असणारी मामाची लेक ‘‘मृणाल‘‘ देखणी, हुशार, लहरी चटकन रागवणारी, रुसणारी.......मामीला

सतत तिच्या या स्वभावाची खूप काळजी वाटायची आणि राग देखिल यायचा पण आईची वेडी माया ! एकाच घरात राहत असूनही मृणाल त्याच्याशी अगदी कमी संबंध ठेवून होती. दोघेही आपापल्या अभ्यासात, कामात, आपल्या मित्रमैत्रिणींमध्ये गर्क असायचे. अरविंद आपल्या खोलीत बसून अभ्यासात इतका बुडालेला असायचा की जेवणाची देखिल शुद्ध नसायची....मामीच वेळ झाली की त्याला हाक मारून जेवायला बोलावून आग्रह करून जेवायला घालायची.

जात्याच हुशार, समजूतदार असलेला अरविंद प्रत्येक वर्षी पहील्या नंबरने पास होतं पुढे पुढे जात होता. अरविंद चे बाबा गेल्यानंतर आई तशी मनाने खचलेलीच होती. अरविंदच्या ग्रॅज्युएशनच्या शेवटच्या वर्षीच ती गेली. आई गेल्याचं दुःख पचवून पहिल्याच प्रयत्नात युपीएससी परीक्षेत तो उत्तीर्ण झाला त्याचा जिल्ह्याच्या कलेक्टरपदी नेमणूक झाली.

देखणी मृणाल पण उच्च शिक्षण घेत होती पण मनापासून तिला फॅशन क्षेत्रात मॉडेल म्हणून काम करायचं होतं चित्रपटसृष्टीत आपलं नाव कमवायचं होतं..... त्यासाठी ती बरीच खटपट करत होती छोटे-मोठे प्रोजेक्ट पण तिने केले होते मॉडेल म्हणून तिचा हळूहळू त्या क्षेत्रात जाऊन जम बसवायचा प्रयत्न करत होती. पण नियतीच्या मनात वेगळंच काहीतरी होतं .... एके दिवशी मृणालची आई आजारी पडली, तिला सीव्हीयर हार्ट अटॅक येऊन गेला. अगदी शेवटच्या घटका मोजायला सुरुवात झाली तिने मृणालला आणि अरविंदला बोलवून घेतलं. दोघांचेही हात एकमेकांच्या हात हातात देत अरविंदला म्हणाली माझी ही शेवटची इच्छा समज की मृणालला तू बायको करून घ्यावी अशी . डॉं नी पण मामीच्या तब्येतीची काळजी घ्यावी लागेल असच सांगितलंच होते. त्यामुळे नाईलाजास्तव मृणाल तिच्या इच्छेविरुद्ध लग्नासाठी तयार झाली.

मामीच्या आजारपणामुळे घरच्या घरीच विधिवत लग्न पार पडलं. नवी नवरी अतिशय देखणी दिसत होती पण तिच्या चेहऱ्यावरच हसू मात्र पार मावळलेलं होतं. मंगळसूत्राच्या विधीच्या वेळेस तर तिच्या गच्च भरलेल्या डोळ्यातून धारा वाहत होत्या.... अरविंदला वाटले तिला आईबाबांचा विरह म्हणून ती रडत असावी. त्यानं तिच्या हात हातात घेण्याचा प्रयत्न केला. तिला आधार द्यावा म्हणून खरंतर त्याने हात हातात घेतला पण मृणालने तो त्वेषाने झटकला. डोळ्यातून गंगा यमुना वाहत होत्या. पण त्याचं कारण काही वेगळंच होतं. मृणालला अरविंद अजिबात आवडत नव्हता. त्याचा साधेपणा तिला अतिशय खटकत होता. तिच्या डोक्यात आपण आपलं करिअर आपलं मॉडेलिंग हेच विषय सतत होते. तिच्या रडण्याचं कारण वेगळंच होतं तिच्या मॉडेलिंगच्या करिअरला आता सोडावं लागेल म्हणून खरंतर ती रडत होती. डोळ्यात अश्रूंचा पूर होता. त्यातले दोन थेंब त्याच्या हातावर पडले.पण करिअरला तिलांजली द्यावी लागते यासाठी त्या धारा होत्या....पण या लग्नाच्या निर्णयामुळे मामीची तब्येत मात्र हळूहळू सुधारत होती. मामा मामींचा चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता .



**सौ आरती राजाराम**
**परिचारक, पंढरपूर**

कसंबसं लग्न पार पडलं. तर अरविंदला दोन दिवसात लगेचच ऑफिस जॉईन करण्याचा अरविंदला मेल आला. अरविंद आणि मृणाल कलेक्टरच्या बंगल्यात राहायला गेले.

पण बंगल्यात आल्यापासून मृणाल अजूनच अरविंद पासून लांब लांब राहू लागली, त्याच्यावर चिडचिड करू लागली, त्याच्याशी नीट बोलत नसायची.. तुझ्यामुळे माझं करियर संपलं...असं सारखं त्याला सुनवायची अरविंद बिचारा समजूतदार ! तिच्या मनाविरुद्ध लग्न झाल्यामुळे तीअशी वागते असेच त्याला वाटायचे. तो तिच्या मनाचाच विचार करून तिच्यापासून तो सतत लांब राहायचा प्रयत्न करायचा. **(क्रमशः)**

# आमिर खानच्या उपस्थितीत रंगला इलू इलू’ चित्रपटाचा प्रिमियर

**ज्योतिर्मय साहित्य**

फाळके फिल्म्स एण्टरटेन्मेंट प्रॉडक्शन आणि अजिंक्य फाळके दिग्दर्शित ‘इलू इलू’ या चित्रपटाची सध्या बरीच चर्चा सुरू आहे. नुकताच या चित्रपटाचा शानदार प्रीमियर सोहळा बॉलीवूड स्टार आमिर खान यांच्या उपस्थितीत दिमाखात संपन्न झाला. मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवरांनी या प्रिमियर सोहळ्याला आवर्जून हजेरी लावली.

‘फाळके या नावातच एक स्पार्क आहे. अतिशय सुंदर चित्रपट अजिंक्य फाळके यांनी केला असल्याचे आमीर खान यांनी यावेळी सांगितले’. चित्रपटाची निर्मीती आणि अजिंक्य फाळके यांच्या दिग्दर्शनाचे मनापासून



कौतुक करत चित्रपट पसंतीची पोचपावती आमिर खान यांनी यावेळी दिली. उत्तम कथा असल्यास एखादा मराठी चित्रपट करायला नक्कीच आवडेल असं आमिर खानने याप्रसंगी आवर्जून सांगितलं.

‘आमिर खान सरांचं मार्गदर्शन या चित्रपटासाठी लाभलं ते आमच्यासाठी मोलाचं होतं. त्यांची ही कौतुकाची थाप आमचा हुरूप वाढवणारी असल्याचं दिग्दर्शक अजिंक्य फाळके याने यावेळी सांगितलं’.

इलू इलू’ या चित्रपटाबाबत तरुण वर्गामध्ये विशेष उत्सुकता पहायला मिळतेय. चित्रपटाच्या गाण्यांनी आणि संगीताने याआधीच प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. ‘इलू इलू’ चित्रपटात बॉलीवूड गाजवलेली प्रसिद्ध अभिनेत्री एली आवराम सोबत वीणा जामकर, आरोह वेलणकर,वनिता खरात, मीरा जगन्नाथ, आनंद कारेकर, श्रीकांत यादव, कमलाकर सातपुते, अंकिता लांडे, गौरव कलुस्ते, निशांत भावसार, यश सणस, सोहम काळोखे, आर्या काकडे-जोशी, सिद्धेश लिंगायत हे कलाकार आहेत.

चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद नितीन विजय सुपेकर यांचे आहेत. निर्माते बाळासाहेब फाळके आणि हिंदवी फाळके तर सहनिर्माते यश मनोहर सणस आहेत. छायांकन योगेश कोळी तर संकलन नितेश राठोड यांचे आहे. संगीत रोहित नागभिडे, विजय गवंडे यांचे आहे. कलादिग्दर्शक योगेश इंगळे आहेत.






# मराठी भाषा अभिजात होती, आहे आणि राहिलच ! -संमेलनाध्यक्ष डॉ.तारा भवाळकर

**शतकाकडे वाटचाल करणा-या या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला महिला अध्यक्षपदाचा सन्मान केवळ पाच लेखिकांनाच मिळाला. कुसुमावती देशपांडे (ग्वाल्हेर) दुर्गा भागवत (कराड), शांताबाई शेळके (आळंदी) डॉ.विजया राजाध्यक्ष(इंदूर) डॉ.अरुणा ढेरे(वर्धा)आणि डॉ.ताराबाई भवाळकर(नवी दिल्ली) नवी दिल्ली येथे ७२ वर्षापूर्वी ५४ वे साहित्य संमेलन झाले होते,तेव्हा महाराष्ट्र राज्याची निर्मितीही झाली नव्हती,आणि अ.भा.मराठी साहित्य महामंडळही अस्तित्वात नव्हते.या ५४ व्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान पंडीत नेहरु यांनी केले होते; अध्यक्ष होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,आणि स्वागताध्यक्ष होते,काकासाहेब गाडगीळ.आता तीच पुनरावृत्ति यंदाही होत आहे.९८ व्या संमेलनासाठी उद्घाटक म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी लाभले आहेत,अध्यक्षपदाचा बहुमान डॉ.ताराबाई भवाळकर यांना मिळाला आहे.तर स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार आहेत.**

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

मॅडम, आपला अभिरुचीचा विषय नाटय आहे, सांगली नाटय पंढरी म्हणून ओळखली जाते, सध्या बघायला गेलं तर नाटय प्रेमाचं जे काही वलय होतं ते खूप कमी प्रमाणात दिसते आहे लोकांमध्ये, सांगलीमध्येही नाटकं खूप कमी होत चालली आहेत तर त्याचं नेमकं काय कारण आहे?

माध्यम दुसरं आलेलं आहे. आता ओटीटी आल्या, ओटीटी आल्या म्हणजे काय झालं? थोडक्यामध्ये, तेच जे नाटयीकरण रंगमंचावर व्हायचं, ते तुम्ही स्क्रीनवर बघू शकता, अशी साधी गोष्ट आहे. माध्यम बदललं, माध्यमांतर झालं परंतु रंजन करणं, त्याच्यातली कथा, त्याच्यामधला बोध, त्याच्यामधला क्राईसेस म्हणजे संघर्ष हा कायम आहे की नाही. जो नाटकामध्ये अभिनय असतं ते कायम आहे की नाही, संगीत असतं ते कायम आहे की नाही. प्रश्न काय आहे की, जे दृकश्राव्य माध्यम आहे, ते अ यंत्राता जनित आलेलं आहे ते प्रत्यक्ष रंगमंचावरचं कमी झालयं, तशातर आपल्या कितीतरी गोष्टी कमी झालेल्या आहेत. जे आपण प्रत्यक्ष करत होतो आणि जे आता करत नाही. किती बायका घरी भाजण्या दळतात आणि रेडीमेड किती आणतात. रेडीमेड मसाले कितीजण आणतात आणि घरामध्ये किती करतात... बाकीच्या सर्व गोष्टी तुम्हाला बाजार जनित पाहिजे असतील तर कारण एक अर्थव्यवस्था पूर्णपणे बदलते आणि बदलत्या अर्थव्यवस्थेमध्ये जीवनाचे सगळे प्रकार बदलत असतात म्हणजे मघाशी म्हटलं तस खाणं पिणं या सगळ्यावर नियंत्रण जे आहे ते बाजाराचं नियंत्रण असतं, अर्थव्यवस्थेचे नियंत्रण असतं आणि ही अर्थव्यवस्था जेव्हा बदलते त्यावेळेला माणसाचं सगळं जगणं बदलत असते.

मग रंगमंचावर विक्रम गोखलेना बघणं, जोशींना बघणं.. नाही, ज्यांना त्याची अपूर्वाई हवी असेल तर ते घेऊ शकतात अजूनाही. नाही घेऊ शकत असं नाही पण दुसरं त्याच्यामधलं अर्थकारणही समजून घ्यायला पाहिजे की तो एक काळ असा होता की, ज्यावेळेस सगळी नाटकात काम करणारी माणसं ही कुटुंबासारखी एकत्र रहायची आणि मग ने एकत्र प्रवास करायचे. आता तसं शक्य नाहीये, कारण एकाच नाटकाचे किती प्रयोग एकाच जागी होणार, त्याच्यामधून उत्पन्न किती होणार, त्या नाटकाच्या प्रयोगासाठी खर्च किती होतो याची कल्पना लोकांना नसते त्यामुळे नुसती टिका करणं सोपं असतं. थिएटरचं भाडं असतं, माईक असतात, मेकअप मेनचा खर्च असतो हे सगळे खर्च जर बाहेर पडायचे असतील तर एका नाटकाचं तुम्हाला हजार रुपये तिकीट लावावं लागेल, हे तुम्हाला परवडणार आहे का? तिकीटं घेऊन नाटक पाहणाऱ्यांना। एक काळ असा होता, म्हणजे माझ्या आठवणीत, इथे भावे नाटय मंदिरमध्ये कमीतकमी नाटकाचं तिकिट हे सव्वा रुपया होतं, पन्नास वर्षांपूर्वीः आणि पाठीमागे जमीनीवर बसूननाटक बघायला लागायचं. त्यावेळेला खुर्च्या नव्हत्या मागे घातलेल्या, आता सव्वा रुपयामध्ये काय मिळू शकतं. अर्थव्यवस्था जी बदलते, अर्थोत्पादनाच्या पध्दती बदलतात त्यामुळे हे बदल होतात. त्यामुळे हे बघणं आनंदाचं आहे वगैरे वगैरे... अमिताभ बच्चन रोज माझ्या घरी आले तरी मला आनंद होईल परंतु ते शक्य आहे का? नाही ना. हे मी कशासाठी सांगतीचे, हे तुम्हालाही एकूण जगण्याकडे बघण्याची दृष्टी निर्माण व्हावी म्हणून तुम्ही इथून पुढे ज्या जगात जगता आहात, त्या जगात जगताना कर्म पहायचं जगाकडे, की ही अर्थव्यवस्था बदलते आहे आणि ती रोकडकेंद्री अर्थव्यवस्था होते आहे. म्हणजे आहे. पैसे दिले नाहीत तर तुम्हाला काही मिळणार नाहीये आणि त्याच्यासाठी तुम्हाला पैसे मिळवायला लागतील अशी साची गोष्ट आहे.

तुमचं एक वाक्य खूप महत्त्वाचं वाटलं मॅडम की, पाठीमागच्या पिढीनं ते टिकवलं नाही.म्हणून आजच्या मुलांपर्यंत ते पोहोचत नाहीये, सध्या पालकांसमोर खूप मोठं आव्हान आहे,लहान वयातच आत्महत्या केल्याची अनेक उदाहरणे आपण आपल्या आसपास पाहात आहे. याचा अर्थ मुलं व पालकांमधील संवाद खूप कमी होत चालला आहे. आणि नकारात्मक गोष्टीकडे मुलांची वाटचाल खूप झपाट्याने होत चालली आहे. याच्यात एकंदरीत पालक कुठे चुकताय

**विशेष मुलाखत**
**प्रशांत गौतम**
**दिपाली यादव-फाळके**

आणि पालकांनी काय सावधगिरी घेतली पाहिजे? आजकाल आईवडील दोघेही नोकरी करतात, मग सगळ्याच गोष्टी वेळेच्या गणितात येवुन बसवायची असतात. त्यामध्येही आपली मुल जर पुढे टिकवायची असतील तर पालक म्हणून काय करावे लागेल?

पहिली गोष्ट म्हणजे आता आपली कुटुंब लहान झाली आहेत. दुसरी गोष्ट विकेंद्रीत कुटुंबव्यवस्था झालेली आहे. एकत्र कुटुंब व्यवस्था असताना एक ना दुसरा कोणतरी आधार असायचा. आता आधारच कोणी नाहीये असं झालेलं आहे आणि त्यामुळे आपण व्यक्त कुठे आणि कसं व्हायचं... माणसाला शेवटी माणसाची सोबत हा अतिशय महत्वाचा भाग असतो कुठल्याही नात्याने आणि मुलं आणि पालक यांच्यामध्ये किंवा कुठल्याही नात्यामध्ये अगदी पतीपत्नीच्या नात्यामध्येसुध्दा ज्याला आपण शारीरिक सोबत म्हणूयात ही जशी कमी कमी होत जाते तसतसं एक तुटलेपण येतं आणि ते तुटलेपण हे स्वाभाविक असतं. आता तुम्ही मी बधा आपण बाहेर काम करणाऱ्या बायका, मी सुध्दा जन्यभर बाहेरच काम केलं. तर आपला जागृतावस्थेमधला, उर्जा असलेला जास्तीत जास्त वेळ आपला घरच्यापेक्षा घराच्या बाहेर जातो आणि शेवटी तुमचं शरीर आहे, तुमच्या उर्जेलाही काही मर्यादा आहेत की नाही, किती ती वेळ उर्जा टिकणार. शेवटी ठीक आहे बाईने आपलं काय घर सांभाळावं, स्वयंपाक करावा, मुलं सांभाळावी, तिने पैसे पण मिळवून आणावेत तिथेही नीट डोकं घालून काम करावं, उद्या तुमचं जर हिशेबामध्ये काही चूक झाली तर दुसऱ्या दिवशी तुम्हाला तिथून नोकरीतून हकलून देतील की नाही आणि नौकरीतून हकलून दिलं तर घरातही कोणी विचारणार नाहीत, घरातही बाईला किंमत कशामुळे आहे तर ती आता मिळवती आहे म्हणून आणि ते आता पार ग्रामीण ग्रामीण भागापर्यंत सगळीकडे पसरलेलं आहे. अर्थव्यवस्था ही अतिशय महत्वाचा गाभा आहे या सगळ्याचा आणि त्यामुळे मुलं आणि पालक यांच्यामधला संवाद तुटत चालला आहे वगैरे या सगळ्या गोष्टी मान्य आहेत त्याबद्दल वाद नाही, तर त्याचं व्यवस्थापन हे घरामधल्या त्या आईबापांनी करायला पाहिजे. म्हणजे ते फक्त आईवर सोडून किंवा नुसतं स्त्री घटकांच्यावर सोडुन चालणार नाही, पुरुष घटकांचाही मग कुठल्याही नात्यांनी असू देत मग तो आजोबा असू देत, भाऊ असू देत, बाप असू देत काका असू दे, मामा असू देत तर पुरुष घटकांचाही त्यांच्या संगोपनामध्ये त्यांच्या व्यवस्थापनामध्ये सहभाग पाहिजे.

**हा जागतिकीकरणाचा, आधुनिक काळ आहे. या काळात लोक साहित्य आज कोणत्या टप्प्यावर आहे.तसेच सध्या स्थानिक कलावंत, लोक कलावंत हे आज कुठल्या टप्प्यावर आहेत?**

काय आहे. आपण पुन्हा पुन्हा त्या भूतकाळाच्या चिखलामध्येच पाय देऊन राहणार असू तर पंचाईत होणार आहे. त्यातील काळाच्या ओघामध्ये टिकण्याजोगं असतं ते नेहमी टिकत असते आणि जे टिकण्याजोगं नसतं ते गळून पडत असतं. डार्विनने सांगितलेला उत्क्रांती सिध्दांत या,उत्क्रांती सिध्दांतामध्ये सुद्धा माणसाच्या शरीराच्या ज्या अवयवांचा आपण उपयोग केला नाही ते अवयव क्रमाक्रमाने गळून पडले. शेपटी नाहीशी झाली माणसाची, मोठे क्रूर दात होते तेही आता बोथट व्हायला लागलेले आहेत. याचे कारण असं की, ज्याचा उपयोग नाही ते आपोआप नाहीसं होतं. त्यामुळे आता आमचा पोवाडाच टिकला नाही अन लावणीच टिकली नाही त्याच्यातले कलात्मक घटक टिकतात की नाही हा महत्त्वाचा मुद्दा आहे. म्हणजे त्यातली वाद्यं, त्याच्यातल्या चाली, त्यातले लय, वाचं निर्माण करण्याच्या पध्दती, त्याच्यातली कलात्मकता त्याचा वेगळया पध्दतीने उपयोग किंवा त्याच्यातून काही नवीन घडवणं हे चालू आहे की नाही आणि हे जर चालू असेल तर काळाच्या ओघामध्ये आता गोंधळ, भारुड, जागरण हे रहायला पाहिजे वगैरे हे जे दुराग्रह आहेत, आमच्या जर श्रध्दाच विस्कळीत होत असतील, त्या गोंधळ घालणा-या देवीवरच जर आमची श्रध्दा नसेल तर ते नुसतं गोंधळ घालून उपयोग काय?त्यामुळे ते जे कलावंत आहेत त्या कलावंतांनी आपल्या कलांचा उपयोग आणखीन वेगळया मार्गानी करायला पाहिजे आणि ते करत आहेत, करत आलेले आहेत. म्हणजे सगळे आमचे जे सोंगाडे होते ते विनोदी अभिनेता म्हणून पुढे आले, दादा कोंडके सारखे रामनगरीमधल्या श्री राम नगरकर सारखे असे अनेकजण आपल्याला दिसतात. सांगण्याचं तात्पर्य ज्याचा उपयोग नाही ते आयुष्यामध्ये गळून पडत असतं



आणि त्याचा उपयोग त्या काळाच्या संदर्भामध्ये योग्यप्रकारे करून घेत राहिलात तर ते टिकतं. त्यामुळे कलात्मक भाग जो असतो तो टिकतो, तो अधिक उणा होत राहतो हा एक भाग, दुसरा भाग म्हणजे परिस्थिती बदलते, आता तुम्ही वाघ्या मुरळीबद्दल म्हणाल तर ते कायम मुरळींना नाचवत ठेवणार का? माझ्यासारखी स्त्री विचार करणारी बाई म्हणेल की, नाही काही चालायचं, कारण समाजामध्ये स्त्रियांचा हा एक वर्ग यांना विवाहाला परवानगी नाही द्यायची, त्यांनी नुसतं नाचत रहायचं देवाच्या नावाखाली म्हणजे आपली श्रध्दा कुठली अन अंधश्रध्दा कुठली आणि मतलबीपणा कुठला! हा पुरुषप्रधान व्यवस्थेनी धर्माच्या नावावर निर्माण केलेला मतलबीपणा जो आहे, यल्लमाच्या जोगल्या. वाघ्याच्या मुरळ्या के सगळं नाहीसे झालं पाहिजे आणि ते नाहीसं होतयं, कायद्यांनी नाहीसं होतं आहे, त्या गोव्यामध्ये देवदासी प्रथा सरकारनी बंद केलेली आहे. स्त्रियांनी कायम पुरुष रंजनासाठी नाचतच राहिलं पाहिजे आणि ते पदर उडवून लावण्या म्हटल्या पाहिजेत हे मान्य होणार नाही आणि का व्हावं त्यांना जर दुसऱ्या कलात्मक गोष्टी येत असतील आणि नसेल एखादीला करायचं, केवळ ती त्या मुरळीची मुलगी आहे किंवा देवदासीची मुलगी आहे म्हणून तीने ते आचरण करायचं का? हे चुकीचं आहे.

***

हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559